MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड
(CIN NO.U40109MH2005SGC153646)
अधिक्षक अभियंता (स्थापत्य) यांचे कार्यालय,
अ.ऊ.दा स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था मंडल, प्रशासकीय इमारत, २रा मजला, जुना सायखेडा रोड, दुर्गामाता मंदिराजवळ, जेल रोड, नाशिक-रोड - पिन : ४२२१०१.फोन नं. :०२५३-२४०३०६२, फॅक्स नं.:०२५३-२४०३०६३
Email/se5700@mahatransco.in

जा. क्र:अअस्था/अऊदा/स्थाबांवसुमं/ना/मासं/ 631 दिनांक : 12 JUN 2019

:-सुचना-:

विषय:-नोंदणीकृत बेरोजगार सहकारी सेवा संस्थांना स्थानीक स्तरावरील अर्धकुशल/कुशल कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविण्याची दिली जाणारी कामे विना निविदा देणेबाबत.

संदर्भ:-१)सांघीक कार्यालयाचे पत्र क्र.१४१४३/दि.३०.१०.२०१३.
२)परिपत्रक क्र.१४२ दि.०३.०१.२०१४.
३)मुअ/अऊदा. बां. तथा संवसु परिमंडल/ नाशिक/मासं/ ०९९९ दि. २७. ०५.२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन नोंदणीकृत बेरोजगार सहकारी सेवा संस्थांना स्थानिक स्तरावरील अर्धकुशल/कुशल कामगार पुरविण्याची कंत्राटी पध्दतीने दिली जाणारी कामे विना निविदा देणेबाबत बैठक दि.१८.०६.२०१९ रोजी मा.अधिक्षक अभियंता (स्था) अउदा.स्था.बां.नि.सु.मंडल, नाशिक, यांच्या कार्यालयात ठिक ११.३० वाजता बोलवण्यात येत आहे.

तरी नोंदणीकृत बेरोजगार सहकारी सेवा संस्थांनी खालील कागदपत्रांसहीत वेळेवर उपस्थित रहावे.

**बेरोजगार सेवा सहकारी संस्था करीता आवश्यक कागपत्रे**

**तांत्रिक निविदा(Technical Bid):**

- बेरोजगार सहकारी सेवा संस्था नोंदणी प्रमाणपत्र
- निविदा सादर करणा-या संस्थेचे संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता.
- ठेकेदाराचे नाव, त्याचा कायमस्वरुपी पत्ता व रहिवासाचा दाखला.
- कंत्राटी कामगार पुरविण्याचा परवाना **(License)**
- कामगार राज्य विमा योजना लागू असल्यास कामगार राज्य विमा योजनेचा कोड नंबर.
- भविष्य निर्वाह निधीचा कोड नंबर.
- व्यवसाय कर क्रमांक.
- मुंबई दुकाने व आस्थापन अधिनियम-१९४८ अंतर्गत व्यवसाय परवाना.
- कंत्राटदार संस्थेचे, बॅंकेचे नाव, संपुर्ण पत्ता, खाते क्रमांक व पॅनकार्ड क्रमांक.

**पुरविण्यात येणा-या कामगारांची आवश्यक कागदपत्रे**

- पदवी प्रमाणपत्र निम्नस्तर लिपीक पदाकरीता.
- १० वी /१२वी प्रमाणपत्र लिपीक/संगणक संचालक पदाकरीता.
- **MH-CIT** प्रमाणपत्र.
- टंकलेखनाचे ज्ञान असणे आवश्यक.
- रहीवाशी दाखला.

वेळेवर उपस्थित नसलेल्या संस्थांचा काम वाटपासाठी विचार केला जाणार नाही. तसेच नंतर कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही. तसेच काम वाटप बैठक संबंधी सर्व अधिकार मा.अधिक्षक अभियंता (स्था)यांच्याकडे राहतील.

(शरद लोखंडे)
अधिक्षक अभियंता (स्था)

प्रत रवाना:- १.नोटीस बोर्ड/गुरुधारीणी.

8: Unemployed FEES Ltr.Coresp.T.folder.E